NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक ०९.११.२०२६ सोमवार

पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर अंतर्गत ''ऑपरेशन ऑल आऊट'' राबविलेबाबत.

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपुर शहर, यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनात दिवाळी सण–उत्सव अनुषंगाने नागपूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेकरीता तसेच, शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरीता समाजकंटक, सराईत गुन्हेगार, फरार आरोपी, पाहिजे आरोपी व प्रतिबंधक कारवाईतील आरोपी यांचे हालचालीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०८.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०९.११.२०२६ चे ०२.०० वा. चे दरम्यान, नागपूर शहरातील सर्व पोलीस ठाणे हद्दीत ''Operation All Out'' विशेष मोहीम राबविण्यात आली.

मोहीमेत मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्तांसह, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सहा. पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे, श्रीमती विनिता शाहु, मा. पोलीस उपायुक्त (परि. क्र. १ ते ६/विशेष शाखा/गुन्हेशाखा/वाहतुकशाखा) नागपुर शहर, सर्व विभागीय सहायक पोलीस आयुक्त, नागपुर शहर तसेच, सर्व पोलीस ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हे आपले अधिनस्त पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचेसह सहभागी होते. Operation All Out दरम्यान पोलीस अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करुन, कोंबींग ऑपरेशन राविबण्यात आले. मोहीमेमध्ये जेल रिलीज, हद्यपार आरोपी, शरीराविरुध्द/मालमत्तेविरुध्द अभिलेखावरील आरोपी, एमपीडीए, जेल व मकोका रिलीज आरोपी तसेच, शस्त्र बाळगणारे आरोपी राहणाऱ्या वस्त्या प्राधान्याने चेक करण्यात आल्या. फरार/पाहिजे/जामीनाचे अटी भंग करणारे आरोपी, सराईत गुन्हेगार व हिस्ट्रीशीटर यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. Operation All Out दरम्यान संशयास्पद वाहने, हॉटेल्स/लॉज/धर्मशाळा/रिकामी घरे, झोपडपट्टया व बांधकामस्थळे, कबाडखाने, भंगार दुकाने व निर्जनस्थळे यांची विशेष तपासणी करण्यात आली. अभिलेखावरील शस्त्र बाळगणारे आरोपी तसेच, त्यांचे घराची झडती घेऊन हत्यार प्रतिबंधक कायदा, त्याचप्रमाणे अंमली पदार्थांबाबत गुन्हे दाखल असणारे आरोपी यांचे घराची पाहणी करून अंमली पदार्थ कायद्यान्वये कारवाई करण्यात आली. विशेष शाखा, नागपुर शहर येथील अधिकारी व अंमलदार यांनी मोहीमेत सहभागी होऊन, पोलीस आयुक्तालय हद्दीतील हॉटेल/लॉजेस/मर्मस्थळे व संवेदनशील ठिकाणांची कसुन तपासणी केली.

Operation All Out मध्ये वरीष्ठ पोलीस अधिकारी यांचेसह गुन्हेशाखा, वाहतुक शाखा, परिमंडळ क्र. १ ते ६ मधील अधिकारी व अंमलदार तसेच, नियंत्रण कक्ष येथील दंगा नियंत्रण पथके, जलद प्रतीसाद पथक हे सहभागी होते. नागपुर शहरातील यांची मोहीमेदरम्यान केलेली कारवाई पुढील प्रमाणे सविस्तर–

अनु.क्र.	कारवाई		एकुण
१	पाहिजे आरोपी	एकुण पाहिजे आरोपी	७९९
		तपासलेले आरोपी	१२४
		अटक केलेले आरोपी	००
	फरारी आरोपी	एकुण फरारी आरोपी	३०३

२		तपासलेले आरोपी	५९
		अटक आरोपी	००
३	तडीपार आरोपी	एकुण आरोपी	१७४
		तपासलेले आरोपी	१०८
		अटक केलेले आरोपी	०१
४	जेल रिलीज	एकुण आरोपी	६८०
		तपासलेले आरोपी	८४
		मिळुण आलेले आरोपी (प्रतिबंधेक कारवाई)	११७
५	एमपीडीए रिलीज	एकुण आरोपी	७२
		तपासलेले आरोपी	५६
		मिळुण आलेले आरोपी (प्रतिबंधेक कारवाइ)	१४
६	मकोका रिलीज	एकुण आरोपी	१०५
		तपासलेले आरोपी	६५
		मिळुण आलेले आरोपी (प्रतिबंधेक कारवाइ)	१७
७	स्थायी वॉरट (Standing warrant) बनावणी	एकुण प्रलंबित संख्या	१३
		किती बजावले	०१
		शिल्लक संख्या	१४
८	अजामिनपात्र वॉरट (NBW) बजावणी	एकुण प्रलंबित संख्या	२९
		किती बजावले	०१
		शिल्लक संख्या	३२
९	एन.डी.पी.एस. (Possession) गुन्हयातील अभिलेखावरील आरोपी	एकुण आरोपी	१३७
		तपासलेले आरोपी	५७
		मिळुण आलेले आरोपी	३४
१०	पोक्सो गुन्हयातील अभिलेखावरील आरोपी	एकुण आरोपी	५४
		तपासलेले आरोपी	१४
		मिळुण आलेले आरोपी	११
११	जबरी चोरी (मोबाईल/चैन स्नेचिंग इत्यादी) गुन्हयातील अभिलेखावरील आरोपी	एकुण आरोपी	७३
		तपासलेले आरोपी	३३
		मिळुण आलेले आरोपी	१३
१२	शरिराविरुध्द गुन्हे करणारे आरोपी	एकुण आरोपी	५२५
		तपासलेले आरोपी	२०३
		मिळुण आलेले आरोपी	१२६
१३	वाहन चोरी चे गुन्हे करणारे अभिलेखावरील आरोपी	एकुण आरोपी	११७
		तपासलेले आरोपी	५२
		मिळुण आलेले आरोपी	२४
१४	घरफोडीचे गुन्हे करणारे अभिलेखावरील आरोपी	एकुण आरोपी	२५८
		तपासलेले आरोपी	७३
		मिळुण आलेले आरोपी	३३
१५	३,२५/४,२५ भा.ह.का.	दाखल गुन्हे	०५
		अटक केलेले आरोपी	००
		किती अवैध अग्निशस्त्र/हत्यार जप्त	०४
१६	अंमली पदार्थ विरोधी कारवाई Possession (NDPS act)	दाखल गुन्हे	००
१७	अंमली पदार्थ विरोधी कारवाई Consumption (NDPS act) अवैध दारू विक्री कारवाई	अटक केलेले आरोपी	०९
		दाखल गुन्हे	०९
		जप्त मुद्दमोल	५,९८०/–

१८	जुगार प्रतिबंधक कारवाई	दाखल गुन्हे	०४
		जप्त मुद्दमोल	४९,०६०/—
१९	उघडयावर दारू पिणाऱ्यांवर कारवाई		०१
२०	मपोका १४२ अन्वये कारवाई		०१
२१	मपोका १३५ अन्वये कारवाई		०४
२२	मपोका १२२ अन्वये कारवाई		०८
२३	फेरीवाल्यांवर केलेली कारवाई.		०७
नाकाबंदी			
२४	वाहने तपासली	दुचाकी	५६०
		चारचाकी	२२७
२५	मोटार वाहन कायद्यांन्वये करण्यात आलेली कारवाई		४५
२६	कलम १८५ मोवाका अन्वये करण्यात आलेली **ड्रंकन ड्राईव्ह** कारवाई		१०
२७	कलम १८४ मोवाका अन्वये करण्यात आलेली कारवाई		०८
२८	कलम ११०, ११७ मपोका अन्वये करण्यात आलेली कारवाई		३९
२९	कलम ३३ आरडब्ल्यु अन्वये करण्यात आलेली कारवाई		०२
३०	कोटपा कायद्यांतर्गत करण्यात आलेली कारवाई		०२
३१	**इतर महत्वाची कारवाई**	नागपूर शहरातील ओयो हॉटेल्स्, लॉजेस, सराय, ढाबे व आस्थापना जास्तीत जास्त प्रमाणात चेक करण्यात आल्या.	

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे भांडेवाडी :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ०९.११.२०२६ चे १३.५५ वा. चे सुमारास, भांडेवाडी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांना अंबेनगर येथील नागोबा मंदीरजवळ, सार्वजनिक रोडचे कडेला काही लोकांची गर्दी दिसल्याने, तेथे गेले असता, रेकॉर्डवरिल गुन्हेगार देवव्रत पन्नु वर्मा वय २७ वर्ष रा. फ्लॅट क्र. २२१, ठाकुर किराणा स्टोअर्सजवळ, अंबेनगर, नागपूर हा दिसुन आल्याने, त्यास ताब्यात घेऊन पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता, त्याने परिधान केलेल्या जिन्सपॅन्टचे आत कंबरेत लपवुन ठेवलेला एक लोखंडी चाकु किंमती १००/— रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी सरतर्फे पोहवा अश्विन बडगे यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे भांडेवाडी येथे पोउपनि कृष्णा साळुंके यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे यशोधरानगर :—शस्त्रासह धुमाकूळ घालणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ०९.११.२०२६ चे ०१.५५ वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे पथक हे गुन्हेगारांचे शोधार्थ पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना इंदीरा माता नगर येथे एक इसम अंधारात लपुन असलेला दिसला. त्यास हटकले असता, तो पळु जाऊ लागल्याने त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रोहीत विजय बरघट वय २२ वर्षे रा. शितलामाता मंदीरवजळ, इंदीरामाता नगर, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अंधाराचा फायदा घेऊन, चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी सरतर्फे पोअं. रितेश दुधे यांचे तक्रारीवरुन

पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि अश्विनकुमार खेडीकर यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे नवीन कामठी :– दिनांक ०८.११.२०२६ चे १४.४० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मुलगा नामे रोहीत कुमार धुर्वे वय २७ वर्ष रा. शिवमंदीरजवळ, जुनी कामठी ता. पारशिवनी जि. नागपुर हा दुचाकीने पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, कामठीकडून नागपूरकडे जाणारे रोडवरुन जात असता, एसबीआय बॅकेजवळ, गरुड चौक पे–अकाऊंट ऑफीससमोर त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने, तो रोडच्या डिव्हायडरला धडकुन गंभीर जखमी झाला. त्यास उपचाराकरीता आशा हॉस्पिटल, कामठी येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी कुमार तानबाजी धुर्वे वय ५० वर्ष रा. शिवमंदीरजवळ, जुनी कामठी ता. पारशिवनी जि. नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे पोउपनि सतिष पवार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

(मिसींग)

पोलीस ठाणे हुडकेश्वर :– फिर्यादी मारोती बालाजी शेंद्रे वय ५२ वर्षे, रा. प्लॉट क्र. १३७, निलकमल नगर, हनुमान मंदीर जवळ, हुडकेश्वर, नागपूर यांनी पोलीस ठाण हुडकेश्वर येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे कु. दर्शना मारोती शेंद्रे वय २३ वर्षे, ही दिनांक २३.१०.२०२६ चे १५.३० ते १६.३० वा. दरम्यान राहते घरुन कुठेतरी निघुन गेला. तिचा शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फुस लावून पळवून नेले असावे अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ७ इंच, केस–काळे लांब, अंगात– काळी हॉफ टिशर्ट व हिरव्या रंगाचा लोअरपॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते.



कु.दर्शना

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. २० वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०२१५८/ २००६	कलम ३९२, ३८४,३४ भा.दं.वि.	प्रदीप ध्रुवसिंग थापा वय २३ वर्ष, रा. रामसुमेर नगर, कावरापेठ, रजवा तिवारीचे घराजवळ, लकडगंज, नागपुर.	१८.११.२०२६

२	मा. अति. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०१३९५/ २००७	कलम ८२ सीआरपीसी	शेख वसीम शेख अफझल वय २४ वर्ष रा. शांतीनगर, घाट जवळ, नागपुर.	१६.१२.२०२६

स्वा/–
(अमित देशमुख)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.